
# Snehal Khandekar: Bhartiya Rajkiya Pakshyanchi Badalti Paddhat



ISBN 978-81-939083-4-1

# भारतीय राजकारण

भारतीय राजकारणावरील विविध शाखांच्या अध्यापकांनी
घेतलेल्या संशोधनपर लेखांचा संपदित ग्रंथ

संपादन
डॉ. अनिल विश्वास

टिआरा पब्लिकेशन्स
दशभूजा गणेश मंदिरागागे, पौड रोड,
कोथरूड, पुणे ४११०२९
tiarapublication@rediffmail.com

मूल्य दोनशे रुपये

- ISBN 978-81-939083-4-1

- **भारतीय राजकारण**
  Bhartiya Rajkaran

- **संपादन**
  डॉ. अनिल विश्वास

- सर्व हक्क सुरक्षित

- **प्रथमावृत्ती** १ ऑगस्ट, २०१९

- **प्रकाशन क्र.** २४

- **प्रती** ५००

- **आकार** डेमी

- **प्रकाशक**
  टिआरा पब्लिकेशन्स
  दशभूजा गणेश मंदिरागागे, पौड रोड,
  कोथरूड, पुणे ४११०२९
  tiarapublication@rediffmail.com

- मूल्य २०० रुपये

(या ग्रंथात प्रकाशित विचार हे त्या त्या मान्यवरांचे असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | संपादकीय, अनुक्रमणिका | | 3-5 |
| 1 | भारतातील लोकशाही | प्रा. रेखा वाठ | 6-8 |
| 2 | जागतिक राजकारणाची बदलती पद्धत | डॉ. अभय रानडे | 9-12 |
| 3 | राजकीय पक्षांची भूमिका | प्रा. एन.आर. ठवळे | 13-15 |
| 4 | सत्तासंघर्षात पक्षाची बदलती भूमिका | डॉ. संजय वानखडे | 16-20 |
| 5 | भारत—चीन संबंध — एक अभ्यास | प्रा. डी.एस. पाटील | 21-23 |
| 6 | राजकारणातील राजकीय पक्षाचे बदलते स्वरूप | डॉ. सावित्री सनागळे | 24-26 |
| 7 | सत्तातरांचे बदलते स्वरूप विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा.सरोज लखदिवे | 27-29 |
| 8 | भारतीय राजकारण आणि राजकीय पक्ष | प्रा. डॉ. सुशीला डाबरे | 30-32 |
| 9 | राजकारणात प्रादेशिक पक्षांचे महत्त्व: एक अध्ययन | प्रा. नीळकंठ नरूले | 33-35 |
| 10 | यवतमाळातील सामाजिक समस्या व उपाय | प्रा. प्रशांत जवादे | 36-38 |
| 11 | महाराष्ट्राच्या राजकारणात वंचित बहुजन आघाडी | डॉ. संदेश सामटकर | 39-41 |
| 12 | बदलत्या परराष्ट्र धोरणाचा जागतिक राजकारणावर झालेला परिणाम | डॉ. कैलाश नेमाडे | 42-44 |
| 13 | राजकारणात नैतिक मापदंडाची पायमल्ली | डॉ. एस. एम. टाकळे | 45-49 |
| 14 | आपल्या देशापुढील परराष्ट्र धोरणाची आव्हाने | डॉ. गिरीधर साळवे | 50-52 |
| 15 | परराष्ट्र धोरण आणि आपली भूमिका | डॉ. डी.एम. चव्हाण | 53-55 |
| 16 | विविध राजकीय पक्षांची बदलती भूमिका — एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. पांडुरंग इंगळे | 56-57 |
| 17 | राजकारण आणि भारतीय राजकीय पक्षांचे बदलते स्वरूप | प्रा. दमयंती वाळके | 58-59 |
| 18 | इतिहासात महिलांचे स्थान : ऐतिहासिक अवलोकन | प्रा. शीतल राऊत | 60-63 |
| 19 | राजकीय पक्षांची बदलती भूमिका व परिणाम | प्रा. माणिकराव पवार | 64-65 |
| 20 | भारतीय राजकारण आणि भारतीय राजकीय पक्षांची बदलती पध्दत | प्रा.स्नेहल खांडेकर | 66-68 |
| 21 | राज्याच्या लोकशाहीत पक्षाची बदलती कार्यपध्दती | प्रा. डॉ. संजय बनसोडे | 69-70 |
| 22 | भारतीय संविधान | डॉ. वेद पतकी | 71-74 |
| 23 | भूतपूर्व पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग | डॉ. वीरा मांडवकर | 75-77 |
| 24 | राजकीय पक्षांचे सत्तास्वार्थ | प्रा.डॉ. वैदेही सामरा | 78-83 |

# भारतीय राजकीय पक्षांची बदलती पद्धत

प्रा. स्नेहल खांडेकर
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

## प्रस्तावना

भारतीय राजकारणाबाबत विचार व्यक्त करीत असतांना राजकारणाची व्यापक दिशा पाहणे गरजेचे आहे. राजकारण म्हणजे अनेक व्यक्तींनी एकत्र येऊन निर्णय घेण्याची प्रक्रिया होय. प्रक्रिया शब्दाचा अर्थ पाहिल्यास सतत सुरू असणारी जीच्या मध्ये सातत्य आहे. अशा बाबीस आपण प्रक्रिया या शब्दाने संबोधतो. जगामध्ये अनेक राष्ट्र अस्तित्वात आहेत आणि प्रत्येक राष्ट्रामध्ये सत्ता हस्तगत करून व्यवस्थितपणे सुशासन चालवून राजकारण करणे अशा प्रकारचा मानस नेत्यांचा असतो. राजकारण केवळ निवडणूकीपुरते मर्यादित नसून राजकारणाचा अर्थ खूप व्यापक आहे. दुर्दैवाने म्हणावेसे वाटते की आपण राजकारणाकडे संकुचित विचारसरणीने पाहतो.

आपला देश किंवा आपलं राज्य कशा प्रकारे चाललं पाहिजे देश चालविण्यासाठी कोणती तत्त्वे असली पाहिजे राज्य कशा करीता चालविलं पाहिजे या सर्व बार्बीचा सरासर विचार जनतेपुढे मांडून त्या विचारांचा आग्रह धरून आणि तो पूर्ण करण्यासाठी निवडणूका लढवून जिंकून येणं यालाच आपण राजकारण असे म्हणतो.

या सर्व राजकिय प्रक्रिया भारतात सुध्दा होत असतांना दिसतात. भारतात लोकशाही अस्तित्त्वात आहे. भारताला स्वातंत्र्य प्राप्त होण्या अगोदर राजाचा पुत्रच राजा होत असे. अशा प्रकारची प्रक्रिया आजही इंग्लंडमध्ये आहे. त्या ठिकाणचा राजा मातेच्या उदरामधून जन्म घेतो. तर आपल्या भारतातील राष्ट्रपती, पंतप्रधान मतपेटीतून जन्माला येतो. भारतीय राजकारणाबाबत बोलायचे झाल्यास स्वातंत्र्यपूर्व काळात फक्त एकच राजकिय पक्ष अस्तित्वात होता आणि तो देखिल 'साम्यवादी पक्ष' असा आपणास निष्कर्ष काढावा लागेल. काँग्रेस बद्दल बोलावयाचे झाल्यास त्यांच्याच मते स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेस हा पक्ष नसून एक लोक चळवळ होती आणि या चळवळीचा उद्देश फक्त भारतास स्वातंत्र्य मिळवून देणे एवढाचा होता.

काँग्रेसने भारतास स्वातंत्र्य मिळवून दिले. पण काँग्रेसची स्थापना या उद्देश प्राप्तीसाठी खरीच झाली असेल का? एक ब्रिटिश अधिकारीसर ॲलन ओ. ह्यूम हा भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून खरच या उद्देशाने पुढे आला असेल का? असे अनेक प्रश्न समोर दत्त म्हणून उभे राहतात. मग ह्यूमने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना का केली. याचे उत्तर आपणास 'सेफ्टी व्हॉल्व्ह सिध्दांत' देतो या सिध्दांतानुसार १८५७ च्या उठावामध्ये ब्रिटिशांबद्दल कलुषितझालेली भावना निघून जावी यासाठी काँग्रेसची स्थापना ब्रिटिश अधिकाऱ्याने ब्रिटिशांच्या वतीने १८८५ मध्ये केली.

याच काँग्रेस पक्षात लोकमान्य टिळकांचा जहाल गट आणि गोखले, आगरकरांचा मवाळ गट दिसून येतो तर हिंदुत्वाकडे झुकलेले श्यामप्रसाद मुखर्जी होते. तर निराश होण्यापूर्वी बॅ. महंम्मद अली जिना हेही होते. दुसऱ्या महायुध्दात ब्रिटिशांच्या शत्रुस मदत करावी अशा विचाराचे सुभाषचंद्र बोस होते तर ब्रिटिशांना मदत करावी अशाप्रकारे काँग्रेस मधील मवाळ गट विचार करीत होता. ह्या सर्व घडामोडीनंतर १५ ऑगस्ट १९४७ ला आपणास स्वातंत्र्य मिळाले. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राजकारण खरोखरच विकासाकडे जात आहे का? २०२० मध्ये खरचं आपण महासत्ता होणार का? याचे उत्तर आपणास शोधावे लागेल. भारतामध्ये बहुपक्ष पध्दती अस्तित्त्वात आहे.

## राजकीय पक्षाचा अर्थ

एडमंड बर्क यांच्या मते ''सर्वानी मान्य केलेल्या विशिष्ट तत्वानुसार संघटितरित्या प्रयत्न करून जनतेचे हित संवर्धन करण्याच्या दृष्टिने एकत्र आलेल्या व्यक्तीचा संघ म्हणजे राजकिय पक्ष होय.''

प्रो. गेटेल यांच्या मते, ''कमी अधिक प्रमाणात संघटित झालेल्या, राजकिय घटक म्हणून कार्य करणाऱ्या, मतदानाच्या हक्काचा उपयोग करून शासन संस्थेवर नियंत्रण ठेवणे आणि आपल्या सर्व साधारण धोरणाची अंमलबजावणी करावी अशा उद्देशाने एकत्रित आलेल्या नागरिकांचा संघ म्हणजे राजकीय पक्ष होय.''

प्रो. मॅक आयव्हर यांच्या मते, ''एखाद्या तत्वाचा अगर ध्येय धोरणाचा पाठपुरावा करण्याकरीता संघटित झालेली आणि सरकारच्या बाबतीत ते निर्णायक व्हावे याकरीता घटनात्मक मार्गाने प्रयत्न करणारी संघटना म्हणजे राजकीय पक्ष होय.''

वरील व्याख्यांमधून राजकिय पक्षांची तत्त्वे, आपल्या निदर्शनास येतात.